# वास्तवातील कविता



वास्तवातील कवी - शिरीष हिरालाल पिंगळे

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# वास्तवातील कविता

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा.

सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# वास्तवातील कविता

(काव्यसंग्रह)

कवी

शिरीष हिरालाल पिंगळे

वास्तवातील कविता

कवी: शिरीष हिरालाल पिंगळे,

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २७ डिसेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# वास्तवातील कविता

# (कविता संग्रह)

**वास्तवातील कवी - शिरीष हिरालाल पिंगळे**
५ब, लोकेश हौसिंग सोसायटी,
यमुनानगर, निगडी, पुणे -४४
फोन : ७२७६०९७६९६
ई-मेल : shirish_pingale@yahoo.com

**दिसामाजी काहीतरी ते लिहावे|**
**प्रसंगी अखंडित वाचीत जावे|**

या समर्थ रामदास स्वामींच्या उक्ती प्रमाणे थोडीफार लिहिण्याची हौस, आपल्या मनातले विचार इतरांपर्यंत पोहोचावेत यासाठी त्यांना कवितेचे दिलेले रूप. या कवितेनेच मला कवी बनविले.
वास्तव, होय मनुष्याने नेहमी वास्तवात जगायला हवे. जे जे म्हणून आपल्याला समोर दिसते, जाणवते, अनुभवायला येते ते वास्तव.
या विचारानेच मी माझ्या या कवितासंग्रहाचे नाव **'वास्तवातील कविता'** असे ठेवले आहे. यातील कविताही वास्तववर आधारित आहेत.

मुखपृष्ठावरील चित्रे अशा प्रकारे चित्रित केली आहेत की जी संपूर्ण ५२ कवितांची चित्ररूपे किंवा नावे दर्शवितात. त्याचबरोबर कवितांमधून आलेली पात्रे, विषय, वस्तूही या चित्रांमध्ये सामावली आहेत.

या कवितांसाठी माझा छंद, कुटुंबीय, आप्तेष्ट, शिक्षक, मित्रमंडळी यांनी प्रेरणा, आशिर्वाद, सदिच्छा, प्रेम, दाद दिली म्हणूनच हा कविता प्रपंच. त्याबद्दल आपणा सर्वांचे मनापासून धन्यवाद.
अशा या प्रेरणेने माझ्या व आपणातीलही काही जणांच्या हातून लिखाणाचे कार्य चालू रहावे ही मनोकामना.

हा कवितासंग्रह मी माझ्या मातोश्री श्रीमती कुसुमताई हिरालाल पिंगळे यांचे चरणी आणि माझे स्वर्गवासी पिता श्री. हिरालाल पिंगळे व माझा पुतण्या विनीत यांच्या स्मृतीस समर्पित करीत आहे.

**- शिरीष हिरालाल पिंगळे**



## कवीक्रमणिका


०१. बाप्पा मोरया
०२. पृथ्वी
०३. आकाश
०४. आग
०५. पाणी
०६. वायु
०७. निसर्ग
०८. सूर्य
०९. चंद्र
१०. वेळ
११. झाड
१२. फुल
१३. पक्षी
१४. पाऊस
१५. आई
१६. वडिल
१७. नवजात बालक
१८. बाळ
१९. माणूस
२०. स्त्री
२१. डोळे
२२. अश्रू
२३. नजर
२४. कान
२५. संगीत
२६. घर
२७. दीप
२८. प्रकाश
२९. प्रश्न
३०. कविता
३१. मन
३२. नाविन्य
३३. शब्द
३४. आठवण
३५. अनिश्चितता
३६. अपेक्षा
३७. भेट
३८. मैत्री
३९. प्रेम
४०. स्वप्न
४१. भावना
४२. तुलना
४३. मदिरा
४४. मतदार
४५. शिक्षक
४६. दिपावली
४७. नववर्ष
४८. गड
४९. खेळ
५०. भारत
५१. कोरोना
५२. समारोप

### *०१. बाप्पा मोरया*

यावे यावे **शिवसुता**
उपकृत करण्या आम्हा भक्ता.

**भालचंद्र** आहेस **हेरंब** ही तू
सर्वांच्या देव्हाऱ्यात असूनही
वाट बघती भक्तगण
होशील कधी ऊत्सवी विराजमान तू.

**गणाधिशा विघ्नहर्त्या**
वाहतो तुला आवडत्या दुर्वा.

**वक्रतुंडा विनायका**
प्रिय तुझे मोदक अर्पितो तुला.

**लंबोदरा गजानना**
बुद्धी देवता **गजवदना.**

**चिंतामणी गिरिजात्मजा**
विद्येचा तू दाता सकळ जनांचा त्राता.

**गणराज** तू **गणपति**
चौसष्ट कलांचा अधिपति.

**शूर्पकर्णा एकदंता**
मुषक वाहना **गौरीसुता.**

**सुखकर्ता** तू **दुःखहर्ता**
तूच कर्ताकरविता **गणेशा**
आहे का बरेवाईट तुझ्याही शब्दकोशा

**गणनायका** गज मुषक पानेफुले आवडती तुला देवा
जपुनी ठेऊ आम्ही हा निसर्गाचा ठेवा.

## ०२. पृथ्वी

पृथ्वी म्हणजे सजीवांचे आगार,
सहजीवनाने जगण्याचा करूया जागर.
सुक्ष्मांपासून महाकाय जीवही वसती पृथ्वीवर,
बहरते जीवन, ज्यांमुळे सृष्टीवर.

मातीचा कण आणि कण चालवी
अव्याहत हे जीवनचक्र.
जीव साखळी नका तोडू,
नाहीतर निसर्गाची नजर होईल वक्र.

वेगवेगळ्या ऋतूत पृथ्वी सजते,
भरभरून देतांना सर्वां, ती विविधतेने नटते.
उन्हाने उन्हाळ्यात, धरणी रूक्ष वाटते,
त्यानंतर झाडांना, पालवी फुटते.

येता पावसाळा पृथ्वी हिरवाईने नटते,
शालूच हिरवा जणू ती पांघरते.
थंडीने हिवाळ्यात धुके पसरते,
अशावेळी, धरतीच आकाश भासते.

अगणित जीव येथे, धरणीवर जीवन जगती,
योगदान प्रत्येकाचे, धरणी मातेप्रती.
सांभाळा आपणही, एकच ही विनंती,
थांबवून प्रदुषण सारे, वाचवू या धरती.

नद्या, वृक्ष, पक्षी, प्राणी असती एकमेका पुरक.
ठरतेय मानव जात, त्यांचीच की हो मारक.
जाईल यामुळे, पृथ्वीचे संतुलन
हाती नाही उरणार काही, संपेल सारेच जीवन.

## ०३. आकाश

स्वर्गही देवांचा जिथे वसे,
नकळत आकाशाकडे नजर फिरे.

लेकरांवरील आईची माया,
आभाळाच्या विशालतेची छाया.

आकाशातूनच येई पाऊस, वारा, ऊन,
करी सृष्टीचे जे नंदनवन.

आच्छादते धरणीस आकाश,
भासे जणू पांघरूण निळेशार.

आकाश विशाल जरी उंचावरी,
पृथ्वीस स्पर्शण्या झुकतसे क्षितिजापरी.

गगनी विहरती पक्षी,
आंगणच जणू ते त्यांसी.

सुर्य, चंद्र, मेघ, तारे,
सोबती या आकाशाचे.

सकाळ, दुपार, रात्र, संध्याकाळ,
छटा बदलत असे आभाळ.

आवाका वाढता आकाशा एवढा,
गवसेल हवे ते, हवे तेव्हा.

ठेवा आकाशासारखे विशाल मन,
जमतील सर्वांशी ऋणानुबंध.

## ०४. आग

आग जेव्हा पोटात पेटते,
भूक शमविण्या अन्न मागते.

आग जेव्हा डोक्यात घुसते,
राग अनावर करून सोडते.

आग जेव्हा सूडाने पेटते,
मानवाला राक्षस भेटविते.

आग जेव्हा जंगलाला घेरते,
वणव्यात सारे जाळून टाकते.

आग जेव्हा भूगर्भात लागते,
ज्वालामुखीचा उद्रेक घडविते.

आग जेव्हा चुलीत पेटते,
सुग्रास भोजन ती बनविते.

आग जेव्हा होमात पेटते,
धार्मिक कार्य घडून येते.

आग जेव्हा अग्निबाण उडविते
तंत्रज्ञानातील प्रगती ती सांगते.

आग सुर्यातील सुर्यकिरण सोडते,
सृष्टीला ताजीतवानी बनविते.

अग्नीसाक्षीने सप्तपदी होते,
आयुष्यभर साथीचे वचन देते.

## ०५. पाणी

पाणी म्हणजे आहे जीवन,
फुटण्या अंकुर पाणीच कारण.

पाण्याशिवाय नाही सृष्टी,
पाणीच देई अपार समृद्धी.

असो शरीर, पृथ्वी-पाताळ,
पाण्याविना नाही आभाळ.

आकाशातून येता पाणी,
पाऊस रूपे भिजवी धरणी.

आगीसारखी भयानकता,
पाणीच शमवी तिची दाहकता.

पाण्याला नसे जरी रंग,
मिसळे ज्यात, घेई त्याचाच संग.

न ओळखता मोल पाण्याचे,
'पाणी-पाणी' होईल आयुष्याचे.

समोर येता दुष्ट प्रवृत्ती,
नष्ट करू 'पाणी पाजूनी' ही वृत्ती.

दुर्भिक्ष पाण्याचे आणिल दुष्काळ,
वाचवूनी आज, बघू उद्याचा सुकाळ.

पाण्यापासून घेऊ शिकवण,
शोधू वाट आपली आपण.

## ०६. वायु

सजीवांसाठी प्राण असे वायु,
अत्यावश्यक असा सर्वदूर व्यापला आहे वायु.

अदृश्य असून अनुभूति देतो वायु,
अविनाशी आहेच पण विनाशीही बनतो वायु.

वारा चालवी होड्या शिडाच्या,
लाटाही बनवितो समुद्राच्या.

वाऱ्यामुळेच उडती पक्षी,
घटक हवेतील बदले पृथ्वीची नक्षी.

शितल वारा घाली रूंजी,
वादळ वारा होई संहारी.

हवीहवीशी वाटते सर्वांना हवा,
तजेलदार करी झुळूक होऊनी हवा.

ओळख वाऱ्यामुळेच होते वासाची,
ऐकण्या संगत याच वाऱ्याची.

वायुच बनवितो वातावरण,
अतिनील किरणांपासून करी रक्षण.

विविध कारणे प्रदुषित करतो हवा,
मानव दुर्लक्षितो असून जाणीवा.

मानव निर्मिती करी निसर्गाचे असंतुलन,
पंचमहाभूते बनून विनाशी, करी मग संतुलन.

माध्यम संदेशवहनाचे पवन,
जपून करूया सुकर जीवन.

### *०७. निसर्ग*

निसर्ग होता माझ्या मनी
वाटले बघावे त्यास जवळूनी.

रोजच्या रामरगाड्यातूनी
काढली वेळ गेलो वनी.

डोंगरदऱ्या झाडांतूनी
वाहते पाणी खळाळूनी.

निसर्गाच्या या किमयेतूनी
मोहरते सृष्टी भरारुनी.

गार वारा साद घाली मनी
वाटे पुन्हा यावे या वनी.

आठवली रोजची कर्मकहाणी
नाईलाजाने आलो परत
जड अंतःकरणी.

## ०८. सूर्य

न चुकता वेळेवर येई
क्षितिजावर अस्ताला जाई
सुट्टी नाही कधीही सूर्या
पृथ्वीस देई अविरत उर्जा.

जरी ओकतो आगच नेहमी
नाही जळत स्वअंगानी
बाष्पीभवनाने पाणी
गाते होऊन पाऊस गाणी.

सुर्यप्रकाश बहू-उपयोगी
वनस्पती यापासून अन्न बनविती
सृष्टीलाही करी प्रकाशी
होते ज्यापासून वीजनिर्मिती.

सुर्योदय होता दिवस उजाडे
जीवनचक्र चाले दिवसभराचे
संध्याकाळी सुर्यास्ताने
चाहूल मग निशेची लागे.

लोहगोल हा असे विलक्षण
वातावरणाचे राखी संतुलन
पोहचवी आपणापर्यंत नीलकिरण
सजीवसृष्टीला देतो जीवन.

घेऊन हे सुर्याचे दान
वाचविण्या पृथ्वीचे वाण
आपणही ठेऊ याचे भान
धरा ही असे सर्वांचे धाम.

## ०९. चंद्र

चंद्राचे आपणाशी नाते,
दूर असूनही जाणवते.

बालपणी रडता बाळा,
चांदोमामा आई दाखवी डोळा.

सुंदरता तरूणपणी प्रेयसीची,
होई तुलना चांद्र-सौंदर्याशी.

नसे स्वत:कडे तेजस्वीता जरी,
परोपकारे सुर्यप्रकाश परावर्तित करी.

शीतलतेने त्याच्या आकर्षिले,
पाऊल मानवाने चंद्रावर ठेविले.

रोज बदलून कला आपुल्या तो दाखवितो,
अमावस्या कधी, पौर्णिमेला लख्ख प्रकाश देतो.

सुर्य त्याच्याकडे निशा सोपवितो,
चंद्र मग तिमिरात वाटही दाखवितो.

चांद्रमास तोच ठरवितो,
आपणाला कालमाप वेळेचे देतो.

कलेने वाढत्या चंद्रासम,
विचार चांगले वाढवीत जावे,

अमावस्येकडे जाणाऱ्या त्यासम,
वाईट विचार काढीत जावे.

### १०. वेळ

वेळेचे ठेवता भान
ठीक होईल सर्व, नका घेऊ ताण.

वेळेचे करता नियोजन
हातावेगळी कामे, होईल योग्य संयोजन.

वेळेची जीवनात शिस्त
व्यवस्थित सारे, ठेवा वेळेवर भिस्त.

वेळ सर्वांसाठी सारखीच
ठेऊन बंधन, निर्णय घ्या वेळीच.

वेळ-काळाचे जमवा गणित
वेळेवर कार्य, आनंद अगणित.

वेळेवर करता गोष्ट
सुकर जीवन, कमी होतील कष्ट.

वेळेची होत नाही साठवण
एक मात्र नक्की, गेलेली वेळच बनते आठवण.

वेळ असे महान
वेळेप्रमाणे वागून, ठेऊ त्याचा मान.

वेळ कशी पाळावी
चंद्र-सुर्याकडे बघून, प्रेरणा घ्यावी.

### *११. झाड*

अरे अरे झाडा नुसताच तू ऊभा
असून तू सजीव आहे की नाही तुला जीव.

आमच्या सारखं वाटत नाही तुला का फिरावसं
ऊभा असतोस एकाच जागी तू वर्षानुवर्ष.

ऊन वारा पाऊस नाही तुला लागत
पक्षी प्राणी यांची असते तुला संगत.

वाढविणाऱ्या आणि तोडणाऱ्या दोघांना देतोस आसरा
नाही तुझ्याकडे कुणी आपला आणि परका.

घेईल जेव्हा माणूस तुझं हे परोपकाराचं देणं
पसरेल सर्व सृष्टीत आनंदी आनंद.

## १२. फुल

विविध रंगांची उधळण ज्यावर,
फुलांना आहे मिळाला हा वर.

देवाच्या वाहती ज्याला पायावर,
फुले उमलती तरू-वेलींवर.

विजेत्यालाही मिळे "हार"
ओवून फुले छानदार.

गजरा होई गुंफूनी फुले,
सौंदर्य त्याने स्त्रीचे खुले.

सुंदर फुले मकरंदाने फुलती,
फुलपाखरे त्यांवर भिरभिरती.

म्हणती ज्यांना देवाघरची फुले,
निरागस ती लहान मुले.

प्रेमालाही भुरळ पडे,
फुलाने नाते जुडे.

फुलांना असतो जो सुगंध,
देत असे सर्वांना आनंद.

प्रेरणा घ्यावी फुलांकडून,
आयुष्यात घ्यावे रंग भरून.

### १३ . पक्षी

वाऱ्यावरती स्वार होऊनी,
पक्षी आकाशी तरंगती.
पंखांच्या जोरावर उडूनी,
गगना घालती गवसणी.

काडीकाडी जमवून बनवी,
घरटे पिल्लां साठीचे.
क्षणात इकडे, क्षणात तिकडे,
आकाशच आंगण यांचे.

मधुर कुजन ते सकाळचे,
प्रसन्न करी मन दिवसभराचे.
संध्याछायेला घरट्याकडे,
फिरती थवे या खगांचे.

झाडावरती घरटे पक्ष्यांचे,
उडतांनाही नजर त्याकडे.
किलबिलाटाने यांच्या, झाडही फुलते,
पक्ष्यांना आपुल्या ते, फांद्यांवर खेळवते.

जमीन, पाणी, आकाशात नानाविध प्रकार,
करती स्थलांतर ते, निसर्ग नियमानुसार.
पीसा-पीसाने बनले अंग,
मुक्तपणे सर्व वापरलेत रंग.

बगळ्याची एकाग्रता, भरारी गरूडाची,
पोपटाची विठू- विठू बोली, नजर कावळ्याची,
कोकिळेची मंजुळता, सुंदरता मोराची,
छान निर्मिती ही, असे निसर्गाची.

घेतली प्रेरणा मानवाने,
उडण्या बनविले विमान त्याने.
एकच शिकवण घ्यावी मनुष्याने,
निसर्ग संवर्धन करावे पक्षांप्रमाणे.

### *१४. पाऊस*

आगमनाची ज्याच्या पाहे वाट सृष्टी
अपेक्षा सर्वांची नको त्याची वक्रदृष्टी.
बरसून पावसाने करावी याची पुष्टी.
वर्षातील चार मास करावी वृष्टी.

धरणीचेही जयासी आतुरतेचे नाते
बरसताच तो तीही हिरवा शालू ल्याते.
रंगीबेरंगी पाने फुलेही अच्छादून घेते.
अवघ्या सृष्टीचे रूप पालटून जाते.

नभाकडे बघून शेतकऱ्याही वाटे
भिजव रान माझे उभी रहातील ताटे.
सुकाळ प्रणयाचा पाऊस होताच दाटे.
मनामनात प्रेमाची आग पेटे.

पावसाने वाहती नद्यानाले
भूगर्भी वाढून साठा धरणही भरते.
माणूस प्राणी पक्षी चराचर आनंदते
हेच पाणी सजीवांचे जीवन होते.

पाऊस न येता दुष्काळ ठरलेलाच आहे
पीक नाही पाणी नाही महागाईही वाढे.
अति झाल्यास पूराने हाहाकार माजे
वाहून जाई जीव संपत्ती त्याच्या योगे.

मानवच कारणीभूत या सर्वांशी
करतसे वृक्षतोड हवी तशी.
समतोल सृष्टीचा बिघडवीशी
बनतोय कारण सजीव विनाशी.

## *१५ . आई*

आई म्हणजे **आ** हे **ई** श्वर
आई म्हणजे मायेचे घर.

आई म्हणजे पहिला गुरू
चालणे बोलणे शिके पाखरू.

आईबरोबरील नातेच घट्ट,
म्हणून चाले तिच्याकडे हट्ट.

आई बनवते संस्कारी मन,
आईसाठी मुलेच तिचे धन.

आई म्हणजे कुटुंब संस्था,
कुटुंबाप्रति निस्सीम आस्था.

आईकडे नसे दुजाभाव,
सर्वांसाठी सारखीच तीची धाव.

आई देते जगण्यास बळ.
आई मागते मुलांसाठीच फळ.

आई म्हणजे असे मातृत्व,
काय वर्णावे तिचे दातृत्व.

आईच्या प्रेमास तोडच नाही,
आईसम जगी आहे का हो काही.

### *१६ . वडिल*

पत्नी होता आई, पति **बाप** होई,
करण्या कोडकौतुक बाळाचे, मन भरून येई.
वडिल म्हणजे दुसरी आई,
शिस्तीसाठी मुलांच्या, माया त्यांची दूर जाई.

घालून मुरड आपुल्या इच्छांना,
देती प्राथमिकता लेकरांना.
देऊन आधार अन् पाठीवर थाप,
वडिल म्हणती, धरा स्वयंपूर्णतेची कास.

वाढवा आत्मविश्र्वास, सहनशीलता.
करा कष्ट, शोधा मार्ग अडचणी येता,
खिलाडूवृत्ती, शरीरसौष्ठव, एकाग्रता,
खेळण्या प्रोत्साहन मुलांना देता.

नवी पीढी आपल्याहून पुढारलेली व्हावी,
त्यासाठी आपल्या आकांक्षा त्यागी.
जडणघडण विचारसरणीची,
व्यवहार, अभ्यासातून घडवी मुलांची.

नसतो कधी कसूर कर्तव्यात वडिलांच्या,
घेतात कठोर निर्णय भल्यासाठी कुटुंबाच्या.
नोकरी, व्यवसाय सांभाळून ओढी संसाराचा गाडा,
घरच असे त्यांच्यासाठी प्रशस्त वाडा.

वज्राहून कठोर पिता जेव्हा कन्यादान करतो,
मुलगी जातेय सासरी, म्हणून गळा दाटतो.
प्रगति मुलांची पाहून त्यांना अभिमान वाटतो,
जीवन सार्थकतेने सुखावून जातो.

कुटुंबासाठी तारेवरची कसरत करतो,
आपले कष्ट देखील लपवितो,
सर्व आघाड्यांवर संतुलन साधतो,
वडिलांप्रती भीतीपेक्षा आदरच वाढतो.

### *१७. नवजात बालक*

इवले इवले कान,
डोळे छान छान,
येता कसलाही आवाज,
वळतसे मान.

मऊमऊ केस
ओठ लाल लाल
बोलता लबाडाशी
खुले गोबरे गाल.

छोटूसे हात,
बोट लांब लांब,
वळवून बने मूठ
अंगठा तोंडांत.

पाय गोरेगोरे,
पाऊले छानदार,
चाले पायाची सायकल,
होई हालचाल.

घरात असता बाळ,
आनंदा येई उधाण,
सहवासात त्याच्या,
कळे ना वेळकाळ.

खेळून येई थकवा
भूक लागे पोटी
रडून तेव्हा घेई
घर डोक्यावरती.

### १८. बाळ

आई तुझी सांभाळते तुला उदरी.
स्वागत असे तुझे या भूवरी.

आई वडील वाढवतील सर्वतोपरी
खेळण्या बागडण्याचा पगडा असो बालपणावरी.

खेळूनी आजी आजोबा आप्तेष्टांच्या खांद्यावरी
शिकून होई मोठा सुसंस्कारी.

ऊत्तम आयुरारोग्य मिळो नसे चिंता परी
ठेव सांभाळून ते आयुष्यभरी.

घेऊनी संस्कार शिक्षणाची शिदोरी
उमटव ठसा आपल्या क्षेत्रावरी.

जाण ठेव त्यांनी केले कर्तव्य जरी
देऊन त्यांना आधार तयाची भरपाई करी.

असाच एक दिवस येईल बाळ तुमच्याही उदरी
हेच सांग तयाला आहे हीच परंपरा खरी.

### *१९ . माणूस*

देऊन बुद्धीबोली देवाने
मानवाला पाठविले या चराचरावर प्रेमाने .
अपेक्षित होते देवाला
होईल नंदनवन तयाचे .

परी उपभोगून नैसर्गिक संपत्ती
प्राण्यांना केले गुलाम मानवाने .
लावूनी वेगवेगळे शोध
खरेच प्रगती केली का हो त्याने .

बांधूनी सिमा बनवूनी धर्मपंथ
विष पेरले अराजकाचे .
बाँब क्षेपणास्त्रे हत्यारे बाळगून
होतोय कारणीभूत विनाशाला
स्वतःच्याच कुकर्माने .

देवालाही विचार असेल पडला
मानवात माणूसच नाही राहिला .
आले असेल मनी त्याच्या
का बनविले मी मानवाला .

जेव्हा सोडूनी राग लोभ मत्सर
येईल मानवात माणुसकी
नांदेल तो माणसाप्रमाणे सर्वांशी
सर्वार्थाने होईल हे चराचर आनंदी .

देवही येईल तेव्हा भूवरी
दुर्जनांना मारण्या नाही
तर पाहण्या स्वतःची निर्मिती .

## २०. स्त्री

देवाची असे स्त्री देणगी,
जी उद्धारी मानव जात जगी.

सालस, प्रेमळ, नाजूक, सुंदर,
प्रसंगी होतसे रागिणी कणखर.

मुलगी, माता, सून, आजी,
निभावतेस सहज विविध नाती.

वात्सल्य आईचे , काळजी बहिणीची,
प्रेम पत्नीचे, माया आजीची.

ठेऊनीया वेळेचे भान,
राखतेस तू सर्वांचा मान.

संस्काराने वाढवतेस पीढी,
सांभाळून परंपरा आणि रूढी.

स्त्रीनेच टिकविले पारंपरिक सणवार,
सजून उत्साहाने करतसे साकार.

घडविण्या कुटुंब आणि समाजाचे भविष्य,
वेचतेस आपुले संपूर्ण आयुष्य.

ओळख देवाने तुला दिली वेगळी,
सांभाळ स्त्रीपण ज्याची गोष्टच आगळी.

## २१. डोळे

बघता येते ज्यामुळे सृष्टी,
डोळे देतात अशी दृष्टी.

सुंदर डोळे आकर्षी जन,
जे ठरवती चेहऱ्याची ठेवण.

बऱ्याचदा होते डोळ्यांनीच काम,
इशारा करताच होई तमाम.

मनाची होई एकाग्रता,
बघती डोळे जर न डगमगता.

डोळ्यांचीही असते आपली भाषा
त्यातच कळती विविध नशा.

डोळ्यांतून कळते इमानदारी,
डोळेच पकडतात झालेली चोरी.

आग येते डोळ्यांतून,
राग जेव्हा व्यक्त होतो चिडून.

डोळ्यांतून येती जलधारा,
जाई प्रियजन जेव्हा दूर अंतरा.

डोळ्यात असती अश्रू दोन,
आनंदाचे की दु:खाचे ठरवी मन.

डोळे असूनही घडते दुष्कर्म,
कधी कळेल डोळसाला याचे मर्म.

दृष्टीहीनासाठी मनच डोळे,
नसता बघायची दृष्टी त्याला सर्व कळे.

## २२. अश्रू

अश्रू नव्हेत फक्त पाणी,
डोळ्यांतून प्रकटणारी ती वाणी.

अश्रू म्हणजे भावनांची बोली,
मनातले समजण्या एवढी खोली.

अश्रू बोलून जाती बोल्या,
होता डोळ्यांच्या कडा ओल्या.

अश्रू म्हणजे मनाची भाषा,
समजे ज्यातून पुढील दिशा.

अश्रूंतून प्रकटती भावना,
होता बऱ्या-वाईटाचा सामना.

दाबून नका ठेवू अश्रू,
वाहू द्या त्यांना, मन होईल पाखरू.

आनंदाश्रू आणि दुःखाश्रू,
डोळे तेच, जे देती त्यांना पाझरू.

घेता समोरच्या च्या मनाचा ठाव,
अश्रूंनीच कळेल त्याचा भाव.

अश्रू ढाळता कुणासाठी,
आदर, प्रेम दिसे तयाप्रती.

रंगती स्वप्ने जी डोळ्यांत,
वास्तवाने वाहती ती आसवांत.

बऱ्याचदा अश्रू वाहती एकांतात,
हिम्मत सांगण्याची नसे जेव्हा मनात.

### *२३. नजर*

बघणे हे डोळ्यांचे कार्य,
नजर करतसे ते पूर्ण.

आईची बाळावरील नजर,
काळजीपोटी लक्ष त्यावर.

वडिलांच्या नजरेचा कटाक्ष,
बनवतो मुलांना कर्तव्यदक्ष.

शिक्षकांची भेदक नजरेवर भिस्त,
विद्यार्थी जीवनात आणतसे शिस्त.

चाणाक्ष नजर हेरते हवे ते
असू द्या कितीही बारकावे.

नजरा-नजरेतून जुळतात नाती,
म्हणतात याला मूक संमती.

ललनांच्या नजरा मादक भारी,
लागतात तरूणांच्या जिव्हारी.

नजरेच्या टप्यात येता भक्ष्य,
होई ते शिकाऱ्याचे लक्ष्य.

नजर चूकीने होता गोष्ट,
परिणाम दिसत नाहीत स्पष्ट.

कामात असावे असे सातत्य,
नजर लागून होईल जे प्रसिद्ध.

नजरेत असावी अशी नशा,
जी देईल जीवनाला दिशा.

## *२४. कान*

कानाची श्रवणभक्ती,
विचारांना देई शक्ती.

श्रवणीय संगीत ऐकता कानाने,
प्रफुल्लीत होई मन उल्हासाने.

सजता कानावर कर्णफुले,
बाह्यरूपी सौंदर्यही खुले.

गुप्तता ठेवण्यासाठी असे म्हणतात,
भिंतीला ही कान असतात.

आवाज पोहचवायची ताकद कानात,
कृती काय करायची ठरे मनात.

श्रवणभक्त कान, न ऐकणारे कान,
ऐकूनही न ऐकल्यासारखं करणारेही कान.

दुर्लक्ष होई कानाडोळा करता,
कानावर हात माहिती नसता.

कानाला खडा अति होता,
पसरे विष कान फुंकता.

गोष्ट ऐकता कानाने,
खात्री करावी डोळ्याने.

### *२५ . संगीत*

मन घेई कानाने संगीताचा आस्वाद,
सप्तसूर चढविती ज्याला साज.

मिलाप होता ताल, लय, सूरांचा,
आविष्कार होई मधुर संगीताचा.

भक्ती, प्रेम व्यक्त होई संगीतातून,
सुख-दु:ख, तर कधी आठवण येई दाटून.

संगीत व्यापून आहे सर्व दिशा
ताल, लय हीच त्याची भाषा.

संगीताने होती आजारही बरे,
कारण ते मनावरच फुंकर मारे.

पावसाची टपटप, पानांची सळसळ,
वाऱ्याची शीळ, ओढ्याची खळखळ,

निसर्गाचे असे संगीत साजिरे,
प्राण्यांसह साद घालती पाखरे.

वाद्यांचा समन्वय आणि सुसूत्रता,
वाढवीत असे मनाची एकाग्रता.

समजण्या जीवनाचे सार,
संगीत देत असे आधार.

## २६. घर

प्रवेश करताच प्रसन्न वाटावे
असेच आपुले घर असावे.

जरी घरात असल्या भिंती
हवी त्यात गुंतलेली नाती.

घरात हवीत मुले खेळकर
दंगा करून घर घेतील डोईवर.

नसेल भिंतीला जरी मुलामा
हवा घरात मायेचा ओलावा.

पाने फुले पक्षी परसात
रोज अंगणी होईल कुजन आणि सुवासाची बरसात.

असावा पाहूण्यांचा घरात राबता
पाहुणचार करून मिळेल संतुष्टता.

घराला हवा असा शेजार
जो होईल अडचणीत आधार.

ज्येष्ठ असावेत प्रत्येक घरा
नको वृद्धाश्रमांना थारा.

आजचे घर फारच यांत्रिक झाले
भावनांविना त्याचे घरपणच गेले.

शिकवण घरातील संस्कृती परंपरेची
घडवेल पिढी उद्याच्या जबाबदार नागरिकांची.

### *२७. दीप*

उजेड देई दीप सर्वत्र,
उजळून ठेवी अंधारी रात्र.

मंदिरासमोरील दीपमाळ,
घालवी आयुष्यातून भाविकांच्या अंध:कार.

सुरू होता शुभकार्य दीपाने,
सरे जीवनातील तिमीर या प्रज्वलनाने.

करी दिवा विद्यार्थ्यांची सोबत,
होई अभ्यास रात्र जागवत.

ओवाळता दीप ज्योतीने,
प्रकाशमान होवो आयुष्य दीपाप्रमाणे.

अंधारात दीपच दाखवी वाटा,
इच्छित स्थळी पोहोचवणारा तो त्राता.

परोपकार दीपाच्या ठायी,
उजळवून सभोवती, अंधार स्वत:च्या पायी.

देऊन सर्वा प्रकाशदान,
जळावे दीपासमान.

## २८. प्रकाश

प्रकाश देतो दिवसाला उजाळा,
असो उन्हाळा, पावसाळा की हिवाळा.

कोंबड्याची बांग, उजाडताच होई,
जाग मग पहाटे सगळ्यांना येई.

पानांवर साठलेले दवबिंदू साजिरे,
पडता प्रकाश भासती जणू हिरे.

स्त्रोत प्रकाशाचा सुर्य पृथ्वीसाठी,
देई जीवनसत्त्वांसह प्रकाश सर्वांसाठी.

इंद्रधनुष्य बनवी प्रकाशच पावसात,
खुले सौंदर्य पृथ्वीचे सुदूर आसमंतात.

डोक्यात जेव्हा पडतो प्रकाश,
समजते गोष्ट जरी होई अवकाश.

करावी कशी दृष्टीहीनांनी अनुभूती,
मनंच उजळे दृष्टी त्यांची.

लोप पावता उजेड, चाहूल तिमीराची लागे,
नाही शाश्वत काही, बदल नियमित घडे.

## २९. प्रश्न

प्रश्न हा पडायलाच हवा,
उत्तराने विषय समजून घ्यावा.
प्रश्न पडण्या विचार व्हावा,
उत्तर शोधण्या वेळ द्यावा.

पडतात मनाला अनेक प्रश्न,
काही मनातच राहतात प्रश्न,
काही प्रश्नांना उत्तरच नसते,
न मिळता उत्तर, मन बेचैन होते.

प्रश्नाने जागृत होते कुतुहल वृत्ती,
प्रश्नाने वाढते कल्पनाशक्ती.
प्रश्नाने होई निरसन शंकेचे,
प्रश्नच उघडी भांडार माहितीचे.

जर नेहमी राहिलात दक्ष,
प्रश्न नाही पडणार यक्ष.
प्रश्नांनी वाढते आपुले ज्ञान,
ज्यामुळे ठेवती सगळे मान.

खोटे बोलता, प्रश्नांचा भडीमार,
उमगून आपली चूक शिकवी सुमार.
अभ्यासाने सुटतात परिक्षेतील प्रश्न,
सोडवी अनुभव जीवनातील प्रश्न.

बऱ्याचदा प्रश्नातच असते उत्तर,
कधीकधी काळंच देतो उत्तर.
होता एखाद्या प्रश्नाने निरूत्तर,
करावे स्वावलोकन, सापडेल उत्तर.

## ३०. कविता

वाटलंच एखाद्या विषयावर, लिहाव्यात काही ओळी,
वर्तमानातील प्रसंग, भूतकाळातील आठवणी,
भविष्यातील कल्पनांवर, कवितेच्या रूपात,
करावी रीती, शब्दांची झोळी.

नसे बंधन कवितेला विषय आणि ओळी,
विषय ठरता होई कविता, लिहून चार ओळी,
फुलवी कवितेला, कवी बनून माळी,
प्रोत्साहन देई त्याला वाचकांची टाळी.

कवितेतून विचार वाचकांपर्यंत पोहोचवणे,
आव्हान कवी पुढील नेमके शब्द शोधणे.
कवितेने वाढतो शब्दांचा संग्रह,
कविता छान व्हावी, कवीचा आग्रह.

प्रेरणा कवीला, देती गोष्टी सर्व,
विषय मांडणीचे करी तो कर्म.
कविता असे, कवीचे सर्वस्व,
मन भरले तरच होते ती पूर्ण.

असो कविता, वास्तव वा कल्पना,
ठाव घेई ती, वाचकांच्या मना.
कवितेतील शब्दांना, गूढ असतात अर्थ,
विचार करी वाचक, समजण्या त्यांचे मर्म.

कवी कल्पना ही, असे अशी गोष्ट,
विचार न केलेलेही होत असे स्पष्ट.
आशय कवितेचा, पोहचावा हे उद्दिष्ट,
कविता करते गैरसमज नष्ट.

कधी प्रोत्साहन, कधी कौतुक,
कधी देशप्रेम, कधी निसर्ग,
कधी प्रबोधन, कधी नातेसंबंध,
कविता पोहचवी वाचकांपर्यंत.

कविता करते भूतकाळ जागा,
कविताच सांगते वर्तमानात जगा,
कविता शिकवते भविष्याकडे बघा,
दृष्टीकोन सकारात्मक जीवनी ठेवा.

## ३१. मन

मानवी मन सर्वस्वी अवलंबून असतं
स्वभाव संस्कार विचारपद्धतींवर.
जेव्हा ते एखाद्या गोष्टीचा विचार करू लागतं
तेव्हा त्याला इतर गोष्टींचा विसर पडतो.

याच मनाला दोन बाजू असतात
एक होकारार्थी आणि दुसरी नकारार्थी.
दोन्ही बाजूंकडून प्रत्येक गोष्टीचा विचार होत असतो
जी बाजू वरचढ ठरते मन त्याप्रमाणे वागतं.

मनावर जेव्हा दडपण येतं
तेव्हा मन विचारांविरूद्ध जातं.
एखाद्या मनात काहीच दडून रहात नसतं
तर एखादं मन बरंच काही दडवून ठेवतं.

परंतु जे मन कुठल्याही दडपणाला बळी न जाता
कुणापासून दडवावं काय दडवावं
अथवा कुणाला काय सांगावं हे जाणतं
तेच खरं मानवी मन.

### ३२. नाविन्य

जेव्हा काहीतरी नविन जन्म घेतं
तेव्हा मन वेडं होतं.

मनात काहूर असतं विचारांचं
हेच चक्र फिरत असतं.

याच नाविन्याला या विचारांतून
एक आगळंवेगळं रूप येतं.

काही काळ हेच नाविन्य स्वतःचं
अस्तित्व जपतं.

जेव्हा या अस्तित्वाला बाधा येते
तेव्हा त्याचा स्फोट होतो.

म्हणून दुसऱ्या नाविन्याला जन्म देण्यासाठी
हे नाविन्य विरून जातं.

### ३३. शब्द

व्यक्त होण्यासाठी हवे असतात शब्द.
हे व्यक्त झालेले शब्दच ठरवितात तुमचे प्रारब्ध.
म्हणून म्हणतात नाती टिकविण्यासाठी जपून वापरा शब्द.

नसता लागला विरुद्धार्थी शब्दांचा शोध,
म्हटले नसते कुणी,
ठेवा सकारात्मक दृष्टिकोन.

शब्दांना असते तलवारी सारखी धार,
वापर करतांना करा विचार.
विरोधासाठी विरोध नको,
शब्दासाठी अपशब्द नको.

निःशब्द पणे ही व्यक्त होतात शब्द.
डोळ्यांतून डोकावतात अशावेळी शब्द.
बरेच काही सांगून जातात न वापरताहि शब्द.

जहाल शब्दांमुळे घडते हिंसा,
तर मवाळ शब्दांनी येते शांतता.
शब्द फेक हि आहे एक कला,
ज्याला जमली तो जिंकला.

### ३४. आठवण

आठवण .......
आईच्या वात्सल्याची.
वडिलांच्या धाकाची.
आप्तस्वकीयांची, त्यांच्यासमवेत घालविलेल्या क्षणांची.

आठवण......
भक्तांना देवाची, देवावरील श्रद्धेची.
विद्यार्थ्यांना शिक्षकांची, त्यांनी शिकविलेल्या मूल्यांची आणि शिकवणुकीची.

आठवण......
प्रेमिकांना एकमेकांची,
प्रेम भावनेने जवळ आलेल्या सुखद आणि विरहाने दूर गेलेल्या दुखःद प्रसंगांची.

आठवण....
सैनिकांना आपल्या कुटुंबियांची, त्यांच्या प्रेमाची.
देशवासियांना सैनिकांची, त्यांच्या शौर्याची आणि समर्पणाची.

आठवण.....
मित्रांना मैत्रिची, मित्रत्वाच्या नात्यातून अंगीकारलेल्या सहकाराची.
उतारवयात जगणाऱ्यांना,
आपल्या भूतकाळाची, जी ऊमेद देते जगण्याची.

आठवण.....
केलेल्या चुकांची, त्यांपासून घेतलेल्या धड्यांची आणि या चुकांपासून शिकण्याची.

## ३५ . *अनिश्चितता*

जन्मापासून सुरू होते
जगतांनाही वेळोवेळी
जाणीव आपुली करून देते .

विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये
खेळाडूंना खेळामध्ये
जीवनातील सुखदुःखांमध्ये .

उगवेल सूर्य पण पडेल का ऊन
पावसाळ्यात नभ येतील ना भरून .
मनासारख्या गोष्टी नसतील घडल्या आयुष्यभर
काय सांगावे भविष्यामध्ये होतील त्या खरोखर .

काय होईल कुठल्या क्षणी
सांगू शके ना कुणी .
येणारा प्रत्येक क्षण जगूया आनंदाने .

राजाचा होई रंक कधी गरीबाचा श्रीमंत .
मरण देखील येईल केव्हा नाही कुणा समजत .

अनिश्चिततेमुळे येते ऊमेद जगण्याची
याच अनिश्चिततेच्या गर्तेत ऊभे राहून
मिळवूया मजा आयुष्याची .

### ३६ . *अपेक्षा*

कुणाची असेल आपल्याकडून अपेक्षा,
नेटाने पूर्ण करण्या, करा समिक्षा.

देऊन परीक्षा, नको फक्त गुणांची अपेक्षा.
जगण्या काय हवे अधिक, व्यावहारिकतेपेक्षा.

समजू नका ओझे अपेक्षांना,
अर्ध्यावर सोडू नका केलेल्या प्रयत्नांना.

अपेक्षांमुळे दडपण येता,
एकाग्रतेने होऊद्या पूर्तता.

झालात जर आपल्या उद्दीष्टांत दंग,
होणार नाही अपेक्षांचा भंग.

आयुष्याच्याही अपेक्षा काही,
पूर्ण करा, नाहीतर सुख नाही.

आत्मविश्वास ठेवा धेय्याप्रती,
संयमाने होईल अपेक्षांची पूर्ती.

असाव्यात अपेक्षांसह जाणीवा,
भरून निघतील जीवनातील उणीवा.

अपेक्षा जरूर असाव्यात,
पण अवाजवी नसाव्यात.

अपेक्षांप्रती नेहमीच असावा आदर,
करण्या पूर्ण, करावा आपल्या गुणांचा वापर.

अपूर्ण अपेक्षेचे नसावे शल्य,
ज्यामुळे होईल कमी आपुलेच मूल्य.

## ३७. भेट

भेटीशी असतो निगडित
एखादा प्रसंग,
करतो ती भेट तोच
अविस्मरणीय.

असो भेट कुणाचीही
आस असते,
नाही झाली तर
ओस वाटते.

वाटतच असतं
भेटावं असं,
भेटल्यावर नाही सुचत
बोलावं कसं.

पुन्हा पुन्हा भेटलं तरी
ओढ भेटीची रहाते.
झालेली भेटही
आठवण बनून जाते.

भेटीगाठीतूनच जुळतात
ऋणानुबंध आणि नाती,
सांभाळा मनोमनी
हे जन्मोजन्मासाठी.

नाहीच जमले कधी भेटण्या,
खेद नसावा मनी,
पुन्हा भेटण्या
घ्यावी बांधून खुणगाठ मनी.

भेटीमध्ये 'भेट' देणे,
एक रिवाज आहे,
आपणच 'भेट' होणे
जीव लावून जाते.

स्वत:च कधीतरी स्वत:ला
भेटत जावे,
विसरून 'मी'पण,
स्वत्वाला वाहून घ्यावे.

## ३८. मैत्री

मैत्री आहे असे नाते,
ज्यात मैत्र निवडीची मुभा असे.
मैत्री जीवापाड प्रेम करते,
मैत्रीच जगण्याला अर्थ देते.

मैत्रीत देण्याचे असे वेड,
करावी लागत नसे परतफेड.
आपल्या जवळ कमी असतांना देणे, ही मैत्री असते.
मैत्रीच चांगुलपणाची शिकवण देते.

मैत्री निर्माण करते नवीन नाते,
मैत्रीच सर्वांस जवळ करते.
मैत्री नसते कशावरही अवलंबून,
असते निखळ मैत्रीवरच विसंबून.

गुण अवगुण मैत्रीमध्ये नसती लपत,
खुलेपणाने देतात एकमेकास ओळख.
मैत्री म्हणजे आठवणींची साठवण,
नाही झाली भेट तर शिव्या-लाखोल्यांची पाठवण.

मैत्रीत ना तुझे-माझे, ना मोठेपणा,
वेळप्रसंगी चांगल्यासाठी खोटेपणा.
मैत्रीत नको गैरसमज, हवा विश्र्वास,
मैत्रीनेच वाढे सहकार आणि आत्मविश्वास.

मैत्री नाही असा माणूस नाही
मैत्रीविणा जगणे जीवन नाही.
रक्तापेक्षाही घट्ट, मैत्रीचे नाते,
निभावले नाही नीट, तर वैरही होते.

### *३९ . प्रेम*

प्रेम करावं राधेने कृष्णावर
त्याच्या बासरीच्या मंजुळ सूरांवर,
कृष्णाने राधेच्या भक्तिवर.

प्रेम करावं आईने मुलांवर
मुलांप्रति असलेल्या वात्सल्यावर,
जी वाढतात आईच्या मायेवर.

प्रेम करावं पाल्याने पालकांवर
पालकांच्या काळजीवर,
आदराने त्यांच्या अपेक्षांवर.

प्रेम करावं शिक्षकांनी शिकविण्यावर
विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेवर,
आणि आपल्या ज्ञानावर.

प्रेम करावं विद्यार्थ्यांनी अभ्यासावर
शिक्षकांच्या शिकविण्यावर,
शिकविलेल्या गोष्टी आत्मसात करण्यावर.

प्रेम करावं देशभक्तांनी मायभूमीवर
मायभूमी प्रती असलेल्या अभिमानावर,
देशाच्या एकता आणि अखंडतेवर.

प्रेम करावं सैनिकाने देशावर
शत्रूशी प्राणपणाने लढण्यावर,
प्रसंगी प्राणांची आहुती देण्यावर.

प्रेम करावं शेतकऱ्याने गुरांवर
गुरांच्या निष्ठेवर,
जी चालतात बळीराजाच्या इशाऱ्यावर.

प्रेम करावं खेळाडूने खेळावर
खेळामुळे येणाऱ्या उत्साहावर,
खिलाडू वृत्ती जोपासण्यावर.

प्रेम करावं गायकांनी स्वरावर
स्वरांतील उंच- सखल जागांवर,
आणि या एकाच ठिकाणी "रागा"वर.

प्रेम करावं संगितकाराने वाद्यावर
वाद्यातून निघणाऱ्या स्वरांवर,
हाताच्या बोटांच्या तालावर.

प्रेम करावं कवीने कवितेवर
कवितेच्या आशय आणि विषयावर,
कवितेने कवीच्या प्रगल्भतेवर.

प्रेम करावं प्रियकराने प्रेयसीवर
प्रेयसीच्या सर्वांग सुंदरतेवर,
प्रेयसीने प्रियकराच्या भाव-भावनांवर.

प्रेम करावं यांत्रिकाने यंत्रावर
यंत्रातून निर्मिलेल्या वस्तूंवर,
त्यासाठीच्या प्रगत तंत्रज्ञानावर.

प्रेम करावं नाविकाने समुद्रावर
समुद्राच्या लाटांवर,
सागरातील संपत्तीवर.

प्रेम करावं लेखणीने कागदावर
कागदावर उमटलेल्या शब्दांवर,
शब्दांमधून व्यक्त होणाऱ्या भावनांवर.

प्रेम करावं माणसाने निसर्गावर
निसर्गाच्या चमत्कारांवर,
निसर्ग निर्मित संसाधनांच्या संवर्धनावर.

### ४०. स्वप्न

स्वप्न बघावे, स्वप्न जगावे,
आयुष्यात जगण्यासाठी,
स्वप्नांचेच मनोरे रचावे.

स्वप्नांवाचून व्यर्थ सगळे,
स्वप्नांशिवाय जीवन जगणे,
जगण्याला मग अर्थच नसणे.

स्वप्न म्हणजे असे मागणे,
प्रयत्नांतीही पूर्ण न होता,
खचून न जाता पुढेच चालणे.

स्वप्नरंजन जरूर असावे,
रूपांतर त्याचे सत्यात करावे,
नवनिर्माण त्यांतून व्हावे.

स्वप्न अपेक्षेहून अधिक बघावे,
होता कृतीतून त्याची पूर्तता,
नवीन स्वप्नांसाठी तयार रहावे.

स्वप्न कालचे, स्वप्न उद्याचे,
कालच्या स्वप्नांमध्ये रमावे,
स्वप्नांना उद्याच्या सामोरे जावे.

प्रत्येकाचे स्वप्न वेगळे,
नशिबाचे तर मर्म आगळे,
नियतीच आपला खेळ खेळे.

उद्धारण्या जग मानवतेने,
साकारू स्वप्न परोपकाराने,
काळाचे ही हेच मागणे.

## *४१. भावना*

मानवी मनात असतात भावना,
आपण त्यांना प्रतिसाद माना.

देव दिसताच हात जुळतात,
**श्रद्धा** म्हणून सर्वजण पाळतात.

आई करते लेकरांवर **माया**,
नाही होऊ शकत कुणी तिची छाया.

मनाविरुद्ध गोष्ट घडल्याने येतो **राग**,
ज्यामुळे मनात पेटते आग.

**सुखा** नंतर येई **दुःख**,
दिवसरात्री सारखेच हे चक्र.

येता सुख होई **आनंद**,
फुलवी विनोद चेहऱ्यावर **हास्य**.

दुःखद प्रसंगी येते **दया**,
काळजी घेऊन दुःख वाटून घेऊया.

**प्रेम** असे अशी भावना,
इतर कशातच मन रमेना.

तेच तेच करून येई **कंटाळा**,
संयम वाढवून **उत्साह** करा गोळा.

षड्रिपू असती **काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर**,
अति झाल्यास, जीवन नश्वर.

## *४२. तुलना*

तुलना जगी या सर्वांची,
जननी असे जी विकासाची.

तुलनेनेच मोजली उंची हिमालयाची,
समजली खोली तुलनेमुळेच समुद्राची.

चंद्र-सूर्य, ग्रह-तारे परलोक सृष्टी,
समजण्या दिली तुलनेने दृष्टी.

फरक दोहोंतला तुलनेनेच कळतो
मोठा आणि छोटा मग समजून येतो.

निवडण्यास तुलना पर्याय देते,
विविध पर्यायांतून मन हवे ते घेते.

तुलनेनेच मिळतात विविध परिमाण,
आर्थिक-सामाजिक समजतात परिणाम.

तुलनाच देते गुणवत्तेला वाव,
तुलनाच ठरविते मग त्याचा भाव.

तुलनाच ठरवी, मापदंड सरस,
त्यासम करण्या मग होत असे चुरस.

असे असूनही नको तुलना प्रत्येक गोष्टीची,
निसर्ग देणगी आहेच की अपवादाची.

## ४३. मदिरा

असतील मित्र भेटत,
तर घ्यावी थोडी विकत.
घेऊनी दोन घोट, रंगू द्या गप्पा,
करा मोकळा मनाचा कप्पा.

प्रेम विरहाने घेई, कुणी विसरण्या दु:ख,
पिण्या असो काहीही निमित्त,
जास्त पिऊन नका होऊ मस्त,
नाहीतर होईल संसार उद्धवस्त.

जास्त घेता मदिरा, संथ होते मती,
म्हणून म्हणतात, अति तिथे माती.
मन गुंतवण्याचे समजून साधन,
नका गमावू दारूपायी धन.

दारू नसे सर्वस्व,
नका होऊ देऊ तीचे वर्चस्व.
किती घ्यावी असे आपुल्या हाती,
नाहीतर होईल जीवनाची माती.

होता दिवसाची निशा,
करतात लोक नशा.
होऊन जीवनाची दशा,
बिघडे आयुष्याची दिशा.

## ४४. मतदार

निवडणुकीतील राजा आहेस तू मतदार,
गाजव नक्की तुझा मतदानाचा अधिकार.
मत मागतो कर जोडोनी उमेदवार,
वापर हक्क तुझा निवडण्या तुझ्या भाग्याचा शिल्पकार.

कष्टाने कमावतोस दो करांनी,
कर भरतोस निरनिराळ्या रूपांनी.
या कराचाच वापर केला विकासासाठी सरकारांनी.
योग्य उमेदवार निवड बहुमुल्य मतांनी.

खर्च हा निवडणुकीचा असे भारी
मतदान न करून चुकीच्या उमेदवाराचा विजय लागेल जिव्हारी.
खोट्या आश्वासनांना येईल ऊभारी,
स्वार्थी, भ्रष्टाचारी उमेदवारांना पाठव माघारी.

देतसे जरी तुला निवडणूक एक सुट्टी,
फिरण्या जाण्याआधी मतदानाशी कर गट्टी.
मतदानाचा वाढवूनी टक्का,
लोकशाही मजबुतीचा कर निर्णय पक्का.

जागरूक आपण भारतभूचे देशभक्त,
करून मतदान बनवू देश सशक्त.
लोकशाहीची ताकद बघेल दुनिया,
बनवू पुन्हा भारताला "सोनेकी चिडिया".

## ४५ . *शिक्षक*

ज्ञानाचा ज्यांनी दिलाय सागर,
पदोपदी शिकवणुकीचा करून जागर,
शिक्षकांचा त्या, करूया आदर.

शिक्षक जेव्हा देती शिकवण,
विद्यार्थ्यांनी करावे समर्पण,
शिकून ठेवा आज्ञाधारक आचरण.

माहिती, गोष्टी, शिस्त, संस्कार,
शिकविला शिक्षकांनीच व्यवहार,
घेतलेला पाठ, देई आयुष्या आकार.

शिक्षक म्हणजे आपले मार्गदर्शक,
माणुसकीचे बनून मालक,
सृष्टीचे होऊया पालक.

शिक्षक असते असे अधिष्ठान,
होता आपुल्या शिष्याचा सन्मान,
वाटे त्याचा त्यांना अभिमान.

विद्यार्थ्यांचे करण्या आकलन,
ज्यांनी दिधले आपुले जीवन,
नतमस्तक, त्यांना करूया नमन.

वागणुकीतून प्रतिबिंबीत व्हावे,
शिकलेले सारे गुण दिसावे,
गुरूदक्षिणा त्यांना हिच भावे.

## ४६ . *दिपावली*

दारासमोर सुबक, सुंदर रांगोळी,
स्नेहीजनांच्या गाठीभेटी,
फराळात चिवडा, लाडू, चकली,
आली आली दिपावली.

बच्चे कंपनींना शाळेला सुट्टी,
फटाक्यांची आतषबाजी.
बनवूनी मातीचे किल्ले, जागवी शिवशाही.
आली आली दिपावली.

तोरण झेंडूचे दारावरी,
उजळी पणत्या जागोजागी,
तेवती आकाश कंदील घरोघरी,
आली आली दिपावली.

धन, धन्वंतरीचे पुजन धनत्रयोदशी,
वसु बारस पुजती गोवत्स द्वादशी,
नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन हिच आपुली संस्कृती ,
आली आली दिपावली.

सुगंधी उटणे लावूनी अभ्यंग, नरक चतुर्दशी,
लक्ष्मीपुजना मनोभावे लक्ष्मी पुजती,
मेजवानी पहाट संगीतामधली,
आली आली दिपावली.

पाडव्याला भार्या पतीस ओवाळीते,
भावा बहिणीचे नाते, जगास भाऊबीज सांगते.
वाचता साहित्ये दिवाळी अंकातली,
आली आली दिपावली.

प्रकाशाने अंध:कारावर,
ज्ञानाने अज्ञानावर,
आशेने निराशेवर होऊया विजयी
साजरी करू अशी दिपावली.

### ४७. नववर्ष

वर्षामागून वर्ष बदलते,
वय आपुले वाढत जाते,
वाढवूनी अनुभव आपुला,
वर्ष निघून जाते.

मागे वळून बघतांना
१२ महिन्यांचे वर्ष सरते,
ठरविलेल्या गोष्टींसाठीही
वर्ष कमी पडते.

नववर्ष घेऊन येई
नवीन अपेक्षा आणि आशा.
देऊनी प्रयत्नांना योग्य दिशा,
घालूया गवसणी यशा.

सुख-दु:खाच्या संमिश्र साठवणी,
प्रत्येक वर्षाच्या आठवणी.
संकल्प करून नववर्षी,
जमवूया आनंदी क्षणांची पुंजी.

सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी
वर्षानुवर्षे चाले जगी,
आपणही होऊन अनुयायी,
चालावे त्यांपरी.

वर्ष बदलता, बदलत जाई काळ,
चालत राहिल ऋतुचक्र,
जुळवून घ्या बदलांशी,
हेच सुखी जीवनाचे सार.

## ४८. गड

अभेद्य हे गडकिल्ले शिवबांचे
भूषण असे भारत भूमीचे.
शिवराय रयतेचे मायबाप,
शिवरायांचा आठवावा प्रताप.

महाराजांची चाणाक्ष दृष्टी,
हेरली उंच डोंगरावरील सृष्टी.
मावळ्यांनी गाळूनी घाम,
उभारले हे स्वराज्याचे धाम.

तटबंदी गडाची उभी कातळात,
भक्कमपणे उभी सदासर्वकाळ.
बघून भव्यता बुरूजांची,
छातीत दुश्मनाच्या भरे धडकी.

आजकाल आम्ही करतो चढाई,
नसता साधन सामग्री,
कसे उभारले हे गड,
मनाला नित्य वाटे नवलाई.

गडकोटांची दगड माती,
फुलवी सर करणाऱ्यांची छाती.
बघतांना गडाची माची,
दरीकडे बघून डोळे फिरती.

उंचीवरील पाण्याचे टाके,
थकवा घालवी, तहानही शमवे.
शीतल वारा घाली रूंजी,
निसर्गासह पक्षी उत्साह वाढवी.

गडावरील शिवशाहीच्या पाऊलखुणा,
भरून उर, "जय शिवाजी" घोषणा.
सांभाळा हा ऐतिहासिक वारसा
बाळगा अभिमान, पावित्र्य त्याचे राखा.

## ४९. खेळ

खेळामुळे येते खिलाडू वृत्ती,
जोपासता खेळ, येईल एकाग्रता चित्ती.

खेळानेच सुधारते शरीर यष्टी,
खेळता खेळ, वाढते सहनशक्ती.

खेळानेच वाढे संघभावना,
खेळच वाढवी नेतृत्व गुणा.

खेळाने व्यक्तिमत्व खुलते,
उत्साह आणि चैतन्यही वाढते.

खेळामुळेच वाढतात,
निर्णय आणि शारीरिक क्षमता.

खेळता खेळ शक्ती, युक्तीचे,
होई संतुलन मन-शरीराचे.

देशी खेळांत जमीन, शरीर, मन,
यांशिवाय नसे गुंतवणूक अन्य.

सरावात असेल जर सातत्य,
नियमितपणे होणार जीत.

खेळातील जीत-हार,
शिकवी जगण्या आयुष्यातील चढ उतार.

खेळण्याचा असेल निश्चय दृढ,
होईल पुढील पिढी सुदृढ.

## ५०. भारत

मातृभूमी ही भारत आपुली,
आपण सारे तिचेच बालक.
कृतज्ञतेने झुकवू मान,
बाळगू तिचा सार्थ अभिमान.

स्वातंत्र्य देण्या या देशाला,
वेचले ज्यांनी आपुले जीवन,
स्मरण करून त्या वीरांचे,
करूया स्वातंत्र्याचे जतन.

दिसता तिरंगा फुलते छाती,
रंग तयाचे साद घालती.
त्याग, बलिदान, अहंकार मुक्ति,
प्रतिक त्यांचा रंग केसरी.
ज्ञान, सत्य आणि इमानदारी,
रंग पांढरा शिकवी शांती.
विश्र्वास, समृद्धी-सह प्रगति,
हिरवा रंग, हिरवी धरती.
न थांबता व्हा गतिमान,
अशोक चक्र मध्यावरील शान.

तिन्ही बाजूने सागर लाटा,
उत्तरेत हिमालयाचा वाटा.
निसर्गाचेही ज्याला वरदान,
भारत अखंड बनवू महान.

संरक्षण दले करिती रक्षण,
देशासाठी देती जे जीवन,
आपणही देऊन योगदान,
व्यर्थ न हो त्यांचे बलिदान.

असो अंतराळ वा तंत्रज्ञान,
स्वयंपूर्ण आपण सगळ्यात,
शिस्तप्रिय होऊन करूया,
देशाला विकसित जगात.

## *५१. कोरोना*

असून शहरी आज, भासे आलोय गावी,
चिमणी कावळ्यांचा आवाज, शांतताच केवढी.
आनंदी दिसत आहेत, आज वृक्षही.
शुद्ध होईन म्हणते, थंडगार हवाही.

ना लोक, ना गाडी, निर्मनुष्य सगळे,
श्वास घेतात रस्ते, आज होऊन मोकळे.
वायू, ध्वनी, जल प्रदुषण नाही आज,
निसर्ग नियमांनी जगा, करू नका माज.

गट-तट-जातीमुळे माणूस एक होईना,
असाच मग येतो कोठून तरी *कोरोना*,
निसर्ग मधूनच दाखवी जागा मानवाला,
तरी श्रेष्ठ समजतोय, मानव स्वत:ला.

बुद्धिजीवी माणूस निर्बुद्ध झाला,
एक दिवस असाच, संपवेल तो स्वत:ला.
पृथ्वीसाठी आहे ही धोक्याची घंटा,
निसर्गच फिरवेल मग सगळ्यावर वरवंटा.

कसा रमलाय आज, आपल्या माणसांत,
भिती मरणाची बसली, त्याच्या मनात.
बघ तुझेच बांधव, राबती रूग्णालयात,
विश्वासाने पाळता नियम, होईल कोरोनावरही मात.

## ५२. समारोप

आपणा मुळे जडला कवितेचा छंद,
दिला आणि घेतला त्यातून आनंद.

जोडून विचार आणि शब्द,
मन होत असे कवितेतून व्यक्त.

ना शब्द संपले ना विचार,
ते अव्याहत सुरूच, नाही संपणार.

थांबणे हा निसर्गाचा नियम,
जो असे तात्पुरता, नसे कायम.

समाप्ती असली तरी हा अंत नाही,
विचार चालूच, ते संपत नाहीत.

अखेर असते प्रत्येक गोष्टीला,
त्यासाठीच हा कविता प्रपंच थांबला.

सांगतेने मानतो सर्वांचे आभार,
असेच असू द्या प्रेम, साभार.

घेऊन आपणा सर्वांचा निरोप,
करतो माझ्या कवितांचा समारोप.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

www.esahity.in